आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० डिसेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- व्यापार आणि उद्योग क्षेत्रातल्या प्रतिनिधींसोबत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची अर्थसंकल्पपूर्व बैठक

- बीड जिल्ह्यात १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी
- नववर्षाच्या स्वागतासाठी मुंबई रेल्वे आणि बेस्टकडून अतिरीक्त गाड्या

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात भारताचा १८४ धावांनी पराभव

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज दिल्लीत अर्थसंकल्पपूर्व बैठक झाली. या बैठकीत व्यापार आणि उद्योग प्रतिनीधी तसंच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ सहभागी झाले होते. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली आज या बैठकीला वित्त, गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभाग, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग आणि केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार यासह अनेक विभागांचे सचिव उपस्थित होते.  २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर होण्याची अपेक्षा आहे. अर्थमंत्री सीतारामन यांचा हा सलग आठवा अर्थसंकल्प असेल.

<><><><><>

शेतीशी निगडीत वस्तू, अवजारं यांचा काळाबाजार करणारे दुकानदार आणि अधिकारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा इशारा राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज दिला. खतांचा काळाबाजार होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत होत्या. त्या अनुषंगाने विभागाच्या सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यानंतर कोकाटे बोलत होते. यावेळी काळाबाजार थांबवण्यासाठी दोन दिवसात कारवाई करण्याचे आदेशही कोकाटे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

<><><><><>

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेवर जर अतिक्रमण झाले असेल तर ते अतिक्रमण तात्काळ निर्मूलन करण्यात येईल असं राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज नवी मुंबईत म्हटलं आहे. वाशी इथल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट देत विविध प्रकल्पांची पाहणी त्यांनी आज केली. त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. कायदा कडक करण्यापेक्षा व्यापार आणि मार्केट सुरळित करणे हा मुख्य हेतू असल्याचं त्यांनी सांगितलं. बाजार समितीच्या आवारातल्या इमारती धोकादायक झाल्या असून येणाऱ्या शंभर दिवसांच्या योजनेमध्ये या बाबत वेगाने निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल असं ते म्हणाले.

<><><><><>

शिवसेनेचे माजी खासदार आणि ठाण्याचे पहिले महापौर सतीश प्रधान यांच्या पार्थिवावर आज ठाण्यातल्या जवाहरबाग स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. प्रधान यांचं रविवारी वृद्धापकाळाने निधन झालं होतं. सतीश

प्रधान यांच्या निधनामुळे कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. एक कुशल संघटक, प्रशासक म्हणून त्यांचा नावलौकिक होता, असंही शिंदे यांनी प्रधान यांना आदरांजली वाहताना म्हटलं. ठाण्याचे पहिले महापौर होण्याचा मान त्यांना मिळाला. त्यानंतर ते राज्यसभेत खासदार झाले. दादोजी कोंडदेव स्टेडियम आणि राम गणेश गडकरी थिएटर हे प्रधान यांच्या ठाण्याला दिलेले योगदान आहे.

<><><><><>

हिवाळ्यातलं उतरलेलं तापमान, कमी झालेला वाऱ्याचा वेग यामुळे नैसर्गिक वायुवीजन कमी होऊन, हवेची गुणवत्ता घसरल्याचं तसंच प्रदुषणातही वाढ झाल्याचं बृहन्मुंबई महानगर पालिकेनं म्हटलं आहे. यासोबतच ऐन थंडीच्या काळातल्या ढगाळ हवामान, वाहनांचं उत्सर्जन आणि बांधकामांच्या ठिकाणी निर्माण होणारी धूळ यामुळेही वायू प्रदूषणात वाढ झाली असल्याचं पालिकेनं म्हटलं आहे.

या प्रदुषणात घट साध्य करण्यासाठी तातडीनं उपाययोजना सुरु केल्या आहेत, त्याअंतर्गत बांधकामांमुळे होणारं प्रदूषण कमी करण्यासाठी २८ मुद्यांची सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केली आहे तसंच सार्वजनिक वाहतूक सेवांच्या विस्तार, शाश्वत नागरी वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासारख्या उपाययोजना राबवल्या जात असल्याचं पालिकेच्या निवेदनात म्हटलं आहे.

मुंबई वायू प्रदूषण शमन आराखड्याची आखणी करून त्याअंतर्गत धूळ शोषण संयंत्रांचा वापर, विविध भट्ट्यांचं स्वच्छ इंधन वापराच्या अनुषंगानं परिवर्तन तसंच घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत विशेष स्वच्छता मोहीमेसारख्या उपाययोजना राबवल्या जात असल्याचंही पालिकेनं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था - इस्रो आज रात्री श्रीहरिकोटा इथून दोन उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. इस्त्रोचा अग्निबाण, 476 किलोमीटरच्या वर्तुळाकार कक्षेत एस डी एक्स 01 आणि एस डी एक्स 02 या दोन उपग्रहांना स्थापित करेल. त्यानंतर अंतराळातच हे उपग्रह जोडण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे. ही कामगिरी करणारा भारत हा जगातला चौथा देश ठरेल. केवळ अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनीच आत्तापर्यंत स्पेस डॉकिंग तंत्रज्ञानात प्राविण्य मिळवले आहे.

ही मोहीम यशस्वी झाल्यास भारतीय अंतरिक्ष संशोधन क्षेत्रात पथदर्शी ठरणार आहे.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या विविध सामाजिक - राजकीय घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रशासनानं १२ जानेवारीच्या मध्यरात्रीपर्यंत मनाई आदेश जारी केले आहेत. मराठा, ओबीसी,धनगर समाजाचे आरक्षणासाठी सुरू असलेली आंदोलनं, मस्साजोग इथल्या सरपंचांच्या हत्या प्रकरणावरून सुरू असलेलं आंदोलन, आणि येऊ घातलेलं नववर्ष या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात तणावाची स्थिती निर्माण होऊ नये, तसंच कायदा व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मनाई आदेश जारी केल्याचं जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्पष्ट केलं आहे.

दरम्यान आमदार सुरेश धस यांनी आज जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली आणि ज्यांना शिफारशीनं बंदुकीचे परवाने दिले गेले आहेत, त्यांची चौकशी करावी अशी मागणी केली. यासोबतच मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष

बाब म्हणून बीड जिल्ह्याचं पालकत्व स्वीकारावं अशी अपेक्षाही त्यांनी बातमीदारांनी बोलताना व्यक्त केली.

तर या प्रकरणात महत्वाचे खुलासे होऊन अनेक गैरप्रकार उघड होण्यासाठी धनंजय मुंडे यांचा राजीनामा महत्त्वाचा असल्याचं सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमनिया यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

जेजुरी गडावर आज सोमवती अमावस्या यात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दुपारी एक वाजता देवाच्या उत्सवमूर्तींचा पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी काढण्यात आला. यावेळी देव संस्थानच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून सलामी देण्यात आली. भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हार', 'सदांनंदाचा येळकोट' असा जयघोष करत भंडार्याची उधळण केली. सोमवती अमावस्यनिमित्त जेजुरीत सुमारे चार लाख भाविक दाखल झाले आहेत.

<><><><><>

मराठवाड्याच्या अनेक भागात आज वेळ अमावस्येचा सण साजरा झाला. लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यात, 'येळवस' नावाने हा सण ओळखला जातो. लातूर जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी मित्र-परिवारासोबत शेतात पूजा करून वनभोजनाचा आनंद घेतला.

<><><><><>

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी प्रवाशांच्या सोयाीसाठी मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे उद्या रात्री विशेष उपनगरीय रेल्वे गाड्या चालवणार आहे. मध्य रेल्वेवर विशेष गाडी सीएसएमटी स्थानकातून आणि कल्याणहून रात्री दीड वाजता सुटेल.

हार्बर मार्गावर विशेष गाडी सीएसएमटी आणि पनवेल इथून पहाटे दीड वाजता सुटेल. पश्चिम रेल्वेवर देखील चर्चगेट आणि विरार दरम्यान ८ विशेष गाड्या चालवल्या जातील. चर्चगेटहून ही गाडी रात्री सव्वा वाजता, २ वाजता, अडीच वाजता आणि ३ वाजून २५ मिनीटांनी सुटेल. तर विरारहून पहाटे सव्वा बारा वाजता, पाऊण वाजता, १ वाजून ४० मिनीटांनी आणि पहाटे ३ वाजून ५ वाजता सुटेल.

मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यांवर प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्टच्या वतीनं उद्या विविध मार्गांवर रात्री २५ जादा बसगाड्या सोडण्यात येणार आहे. प्रवाशांसाठी ३१ डिसेंबर रोजी दक्षिण मुंबईतल्या विविध ऐतिहासिक आणि प्रेक्षणिय स्थळांच्या हेरिटेज टूरसाठी वातानुकुलित दुमजली बस चालवण्यात येणार आहे.

<><><><><>

श्रोते हो, २०२४ हे वर्ष संपायला आता अवघा १ दिवस शिल्लक आहे. या वर्षभरात राजकीय क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आज आपण ‘सरत्या वर्षाच्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी आज परभणी जिल्ह्याला भेट देऊन, न्यायालयीन कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी आणि आंबेडकरी चळवळीचे नेते विजय वाकोडे यांच्या कुटुबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं.

यावेळी आठवले यांनी त्यांच्या पक्षाच्या वतीनं सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. तर वाकोडे यांच्या कुटुंबाला ५० लाख रुपयांची मदत आणि घरातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी यासाठी आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

संविधान हा देशाचा आत्मा असून परभणीत संविधानाचा अवमान केला गेला, अशी प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

बॉर्डर-गावस्कर चषक क्रिकेट स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात आज ऑस्ट्रेलियानं भारताचा १८४ धावांनी पराभव केला. दुसऱ्या डावात विजयासाठी ३४० धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघानं आपल्या पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरादाखल भारतानं पहिल्या डावात ३६९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २३४ धावांमध्ये आटोपल्यानंतर सामना जिंकण्यासाठी भारतापुढे ३४० धावांचं आव्हान होतं. त्याचा पाठलाग करतांना भारताचा डाव केवळ १५५ धावात आटोपला. भारतातर्फे यशस्वी जैस्वालनं

सर्वाधिक ८४ धावा केल्या. नितीश रेड्डीचं शतक आणि जसप्रित बुमराह नं घेतलेले ५ बळी महत्त्वाचे ठरले तरी भारताला सामाना जिंकता आला नाही. ५ सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलिया २ - १ नं आघाडीवर आहे.

<><><><><>

जालना शहरात क्रिकेटच्च्या सामन्यादरम्यान फलंदाजी करणाऱ्या विजय पटेल नावाच्या एका ३५ वर्षीय क्रिकेटपटूचा आज सकाळी हृदयविकारानं मृत्यू झाला. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर त्याला तात्काळ रुग्णालयात हलवण्यात आलं होतं. मात्र तिथं पोचवण्यापूर्वीच तो गतप्राण झाला असल्याचं डॉक्टरांनी घोषित केलं. विजय पटेल हा मुंबईतल्या नालासोपारा भागातला रहिवासी होता.

<><><><><>

गेल्या २४ तासांत मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत उल्लेखनीय वाढ झाली आहे. तर कोकणात तुरळक ठिकाणी लक्षणीय वाढ झाली.

येत्या २ दिवसांत संपूर्ण राज्यात हवामान कोरड राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.